MHNG020054942022

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९१७/२०२२
एस. रमा विजय व इतर वि. निरंक

## निशाणी क्रमांक १ वरील आदेश

(दिनांक – २१.०२.२०२३)

प्रस्तुत अर्ज कलम २-क बॉम्बे रेग्युलेशन, १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही मृतक एस. व्ही. विजय भास्करा रेड्डी याची विधवा आणि अर्जदार क्र. २ व ३ ही त्यांची अपत्ये असल्याने बँकेकडून मुळ कागदपत्रे परत घेण्याच्या हेतुने वारस प्रमाणपत्र मिळावे अशी विनंती त्यांनी केली आहे.

०२. प्रकरणात आदेश पारीत करून दिनांक २.११.२०२२ रोजीचे "दैनीक लोकशाही वार्ता" या दैनीक वर्तमानपत्रात सदर प्रकरणाबाबत जनतेस जाहीर नोटीस देण्यात आली. त्या वर्तमानपत्राची आवृत्ती निशाणी १२ खाली दाखल आहे. तसेच जाहीर सूचना निशाणी ५ खाली दाखल केली आहे. तथापि, आजपावेतो कोणतेही आक्षेप अभिलेखावर प्राप्त झालेले नाही. अर्जदार क्र. १ यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी ०९ प्रमाणे अभिलेखावर दाखल केले आहे व अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. अर्जदारांची पूरावा संपल्याची पुरसीस निशाणी १३ खाली दाखल केली आहे. अर्जदारांनी मृतक एस. व्ही. विजय भास्करा रेड्डी यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी १० वर दाखल केले आहे. अर्जदार क्र. १ हिच्या आधारकार्डच्या पडताळणी केलेली प्रत नि. क्र. ११ वर दाखल केली आहे.

०३. जनतेस जाहीर नोटीस देवूनसुध्दा आजपावेतो वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत कोणतेच आक्षेप न्यायालयास प्राप्त झाले नाही. म्हणून अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पूराव्यावरून अर्जदार हे हिंदु वारसा कायद्याचे कलम ८ तसेच परिशिष्ट -१

नुसार मयत एस. व्ही. विजय भास्करा रेड्डी यांचे वारस असल्याचे दिसून येते. म्हणून खालील आदेश पारीत.

**आदेश**

१. अर्ज मंजूर.

२. न्यायालयीन शूल्क भरल्यानंतर बॉम्बे रेग्यूलेशन, १८२७ मधील परिशिष्ट (अपेन्डीक्स) – ब प्रमाणे वारस क्र.१) एस. रमा विजय W/o विजय भास्करा रेड्डी २) एस. भवानी मानसी D/o विजय भास्करा रेड्डी ३) एस. लीला वेदान्त रेड्डी S/o विजय भास्करा रेड्डी हे मयत एस. व्ही. विजय भास्करा रेड्डी यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

DIPAK RAGHUNATH MALI

Digitally signed by DIPAK RAGHUNATH MALI
Date: 2023.02.27 11:54:03 +0530

नागपूर

दि. २१.०२.२०२३.

(डी. आर. माळी)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नागपूर